# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-२२/२०२५** **दिनांक- १६/०१/२०२५**

## प्रेस नोट

**खुना सारख्या गंभीर गुह्यात जामीनावर असलेला व आश्रया करिता भारतात पळालेल्या श्रीलंका देशातील आरोपीतास अटक करण्यात काशीगांव पोलिस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश.**

मा.पोलीस उपायुक्त परीमंडळ ०१ मिरारोड (जा.क्र.वाचक/टे-१/ऑल आउट कोबिंग ऑपरेशन/७७/२०२५ दिनांक ०६/०१/२०२५ रोजीच्या आदेशान्वये पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक १३.१.२०२५ रोजी १८.०० वा. पासुन ते २३.०० वाजेपर्यंत ऑल आउट कोबिंग ऑपरेशन राबिवण्यात आले होते.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तोगरवाड यांच्या मार्गदर्शनाखील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी पोउनि/ अभिजीत लांडे,किरण बघडाणे, पो.हवा/०८००१ प्रताप पाचुंदे, पोशि/१४०५३ नामदेव देवकत्ते पोशि/१६०९० उमंग चौधरी,पो.शि/१२०९३ सुनिल ठाकुर असे कोम्बींग ऑपरेशच्या अनुषंगाने पाहिजे व फरारी आरोपी पकडणे,हिस्ट्रीशिटर यांच्यावर निगराणी ठेवणे तसेच पोलीस स्टेशनच्या हद्दीत हॉटेल व लॉजची तपासणी इत्यादी कर्तव्य पार पाडत असतांना २१.४५ वाजता वेस्टर्न हॅाटेल/लॉजींग , काशिगाव ,मिरारोड पु. ता. जि. ठाणे येथे हॉटेलमध्ये आलेल्या ग्राहकांच्या नोंदीचे रजीस्टर तपासणी करीत असतांना तेथील कर्तव्यावरील लॉजींग मॅनेजर अल्ताफ शेख यांचेकडे विचारपुस केली असता त्यांनी पोउनि /लांड यांना त्यांच्या ग्राहकामध्ये दिनेशकुमार हा संशयास्पद असल्याचे त्यांनी सांगितले त्यावेळी पोउनि लांडे यांनी दिनेश कुमार अय्यर वय ३६ वर्षे या इसमाचे आधारकार्ड चेक केले असता आधारकार्ड संशयास्पद असल्याचे पोउनि /लांडे यांना दिसुन आले. त्यांनी हॅाटेल मॅनेजर यांना दिनेश कुमार यांचा रुम चेक करावायाचे असे सांगुन तो राहत असलेल्या रुम क्रमाक ३०६ येथे मॅनेजर सह गेले, त्याठिकांणी जावुन इसम नामे दिनेश कुमार अय्यर याचेकडे विचारपुस करत असतांना त्याने त्याचे मुळ राहण्याबाबतचा पत्ता तो सांगु शकला नाही त्यावेळी पोउपनि/लांडे यांना सदर इसमाच्या हावभाव बोलचाल बाबत संशय बळावल्याने त्याचाकडे अधिकची चौकशी केली असता त्याने तो श्रीलंका देशाचा नागरीक असल्याचे सांगितले त्यावेळी त्यास विश्वासात घेवुन त्याचे मुळ नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव अरुमाहद्दी जनिथ मदुसंघा डिसिल्वा वय ३६ वर्षे, रा. एन ०६, टेम्पल रोड, टेलवाथा, देश श्रीलंका असे सांगितले त्याचे सदर ठिकाणी येणेबाबतचे कारण व शासकीय परवानगी, पासपोर्ट व्हीझा याबाबत त्यास विचारणा केली असता त्याचेकडे भारत देशामध्ये येण्याचे कोणतेही परवानगी पासपोर्ट व व्हीझा नसल्याचे त्याने सांगितले त्यास पोउपनि/किरण बघडाणे यांनी भारतामध्ये कोणत्या प्रवासीसाधनाचा वापराने प्रवेश केला असे विचारले असता त्याने ३१.१२.२०२४ रोजी समुद्रामार्गे बोटीतुन भारतीय तटरक्षक दलाची नजर चुकवुन भारतामध्ये तमीलनाडु राज्यामध्ये प्रवेश करुन, तमीळनाडु राज्यातुन बस व रेल्वेने मुंबई, ठाणे येथे आल्याचे सांगितले तसेच त्याला भारतात येण्याचा उद्देश काय आहे याबाबत त्याच्याकडे तपास केला असता त्याने सन २०१५ मध्ये स्थानिक टोळीच्या वादातुन श्रीलंकामध्ये खुनाचा गुन्हा केला असुन सदर गुन्ह्यात डिसेंबर २०२४ मध्ये श्रीलंकेच्या न्यायालयाने त्याला त्यांच्या गुन्ह्यात जामीन दिला आहे.जामीनावर श्रीलंकेच्या तुंरुगाच्या बाहेर आल्यावर तो आश्रया करिता भारतात आला असल्याचे त्याने सांगितले आहे.तरि नमुद विदेशी नागरीकास ताब्यात घेवुन त्याच्या विरुद्ध काशिगांव पोलीस स्टेशन गु.र.नं

अटक आरोपी सध्या पोलीस कस्टडी रिमांडमध्ये असुन त्याच्याकडे त्याला भारतात प्रवेश करण्या करिता कोणी मदत केली तसेच त्याच्याकडे असलेले आधारकार्ड,मोबाईल सिमकार्ड त्याला कोणी दिले याबाबत तपास काशिगांव पोलीस स्टेशनचे दहशतवाद विरोधी कक्षाचे पोलीस उप निरीक्षक सचिन शेंडगे हे करत आहे.

सदरची कामगिरी श्री.प्रकाश गायकवाड,पोलिस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे,सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरा रोड विभाग,महेश तोगरवाड,वरिष्ठ पोलिस निरीक्षक,काशिगांव पोलीस स्टेशन, किरण बघडाणे,अभिजीत लांडे,पोलिस उप निरीक्षक,गुन्हे प्रकटीकरण शाखा तसेच गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अंमलदार पो.हवा/प्रताप पांचुदे,पो.शि विक्रांत खंदारे,पो.शि.उमंग चौधरी,,पो शि. किरण विरकर,पो.शि. रविंन्द्र सोनावणे,पो.शि. नामदेव देवकाते,पो.शि. आभिषेक मढावी,पो.शि.सुनिल ठाकुर यांनी केली आहे.




----oooo----